रविवार दि.२४ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ७८

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
# दैनिक लोकनेता
बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राष्ट्रवादीचं पुन्हा.....

## मातृतीर्थ सिंदखेड राजाचे ३ लाख २३ हजार लोक आमदार झालेत

# २५ वर्षाचा प्रस्तापितांचा बाले-किल्ला मनोज कायंदेनी जिंकला

लोकनेता न्यूज नेटवर्क
सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार कायंदे मनोज देवानंद यांचा ४६५० मतांनी विजय होऊन, १ पंचवार्षिक सोडून २५ वर्षापासून ज्यांनी एकहाती सत्ता भोगली असे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. राजेंद्र शिंगणे यांना पराभूत केले आहे. मागील काही वर्षा पासून जातीय राजकारण होत असल्याने व विकासाच्या बाबतीत मागासलेला मतदार संघ म्हणून सिंदखेड राजा मतदारसंघाकडे बघितल्या जाऊ लागेल होते. म्हणूनच या वेळेला विकासाच्या दृष्टीकोनातून मतदारांनी आपल्या मनासारखा आमदार व्हावा या करिता मनोज कायंदे यांना निवडून दिले असल्याची चर्चा सर्वत्र आहे. तरूण तडपदार नेतृत्व म्हणून तरुणांमध्ये मनोज कायंदे याची ओळख आहे. कोणतेही राजकीय पद नसतांना ते जनसामान्य माणसाच्या मनात सुख दुःखात ते सहभागी राहायचे. आणि आता आमदार म्हणून नेहमी तत्पर असतील यात शंका नाही. आता तुम्ही सर्व जनता आमदार आहात अस ते म्हणाले. त्यांच्या विजया नंतर तरुणांनी गावोगावी जल्लोष साजरा केला.





### अशी मिळाली उमेदवारांना मते

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातून मनोज कायदे यांना ७३,४१३ , डॉ शशिकांत खेडेकर,६०,६३५ डॉ राजेंद्र शिंगणे ६८,७६३, दत्तात्रय काकडे २,५०९, दत्तू रामभाऊ चव्हाण ३,५३५, सविता शिवाजी मुंढे १६,६५८, सुरेश एकनाथ घुमटकर ३७०, अब्दुल हाफिज अब्दुल इजाज११४, कुरेशी जुनेद रोफ शेख२८८, गायत्री गणेश शिंगणे ५५८, बाबासाहेब बन्सी म्हस्के १४४,भागवत देविदास राठोड १९९, रामदास मानसिंग कहाळे३३२,विजय पंढरीनाथ गवई५८३, सुधाकर बबन काळे२८६,सुनिल पतंगराव जाधव ७०३, अँड सय्यद मुबीन सय्यद नईम६३९,असे विधानसभेत उमेदवारास मते मिळाली आहे तर या मतदारसंघात नोटासाठी ७४२ मतदारांनी पसंती दिली आहे.

### सुतक पडलेल्या मतृतिर्थाचा विकास अपेक्षित

इथून माघे आमदार कोण झालेत किंवा कोणी सत्ता उपभोगली याकडे लक्ष न देता. छत्रपतींचे आजोळ असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्म स्थळांचा रखडेल्या विकास होवा हीच जनतेची अपेक्षा आहे. आणि आमदार म्हणून मनोज कायंदे त्या विकासाला समर्थ असतील ऐतिहासिक नगरिला ते पर्यटन स्थळ बनवतील. आणि इतिहासात स्थान असलेल्या सिंदखेड राजा ला पुनश्च एका नव्या रुपात आणतील हीच अपेक्षा आमदार म्हणून मनोज कायंदे यांच्या कडून आहे.





### जिल्हा अध्यक्ष अॅड.नाझेर काझी यांच्या प्रयत्नांना यश

अॅड. नाझेर काझी हे माझी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा माणूस असून त्यांना टोल करण्यात आले होते. मनोज कायंदे यांना उमेदवारी देण्यात त्यांची खेळी असल्याचे त्यांच्यावर प्रसारमाध्यमातून आरोप देखील करण्यात आले होते. परंतु नाझेर काझी यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून मुस्लिम समाज हा अॅड. काझी यांच्या पाठी माघे होता आणि या वेळेस देखील खंबीर पने उभा असल्याचे दिसून आले.

### डॉ.शिंगणे यांच्या ठेकेदारांच्या अडचणीत वाढ

सिंदखेड राजा मतदार संघात २५ वर्षात डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या कारकिर्दीत अनेक ठेकेदारांनी डॉ. शिंगणे यांच्या वरदहस्तामुळे दहशत निर्माण केली होती. आता मात्र मनोज कायदे यांच्या विजयाने या ठेकेदारांवर एक दहशत निर्माण झाली असून, त्यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

### विश्वास जून्हा साहेब नाही येत पुन्हा, तरुणांचे स्टेटस व्हायरल

मनोज कायंदे हे विधानसभेत निवडणूक लढवत असतांना मनोज कायंदे समर्थकांनी विश्वास जूना,साहेब नाही येत पुन्हा असे स्टेटस हॉइराल केल्याचे आढळून आले होते. व्हायरल स्टेटस वाल्यांचा विश्वास मात्र खरा ठरल्याने. मनोज कायंदे यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### मनोज कायंदे यांची भव्य मिरवणूक

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात मनोज कायंदे हे विजयी झाल्यानंतर मतमोजणी केंद्रापासून ते मॉ. जिजाऊ राजवाडा, सिंदखेड राजा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाहू फुले यांच्या पुतळ्याप्रयत्न भव्य रॅली काढण्यात आली. त्यानंतर गावोगावी देखील तितक्याच जल्लोषात त्यांच्या समर्थकांनी विजयाचा जल्लोष साजरा केला.



### हनवतखेड येथे जल्लोष,महिलांनी ही केला दादाचा वादा पुरा

दादांचा वादा लाडक्या बहिणींनी देखील पूर्ण केल्याचे चित्र हनवतखेड येथे दिसून आले. आमदार कायंदे यांच्या विजय मिरवणुकीत महिलांनी देखील ठेका धरल्याचे दिसून आले होते. संपूर्ण गावातील महिला देखील या मिरवणुकीत सहभागी झाल्याचं दिसून आले.



सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार पदी मा. मनोज कायंदे याची निवड झाली त्यावेळी आमदार मनोज कायंदे यांना शुभेच्छा देतांना दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, दैनिक विश्वजगत चे पत्रकार अनिल दराडे, दैनिक मातृछाया चे पत्रकार सुरेश हुसे, दैनिक भारत संग्राम चे पत्रकार सचिन खंडारे, बुलढाणा चौफेर चे संपादक गंगाराम उबाळे, इत्यादी उपस्थित होते. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)




सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाच्या आमदार पदी मा. मनोज कायंदे याची निवड झाली त्यावेळी प्रमाणपत्र घेतांना आमदार मनोज कायंदे सह ड. सचिन आंधळे. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)



## संपादकीय..

# विधानसभा एक्झिट पोल महायुतीला अनुकूल



महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेसाठी ६५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले. मतदान संपल्याबरोबर विविध वाहिन्यांचे, वृत्तवाहिन्यांचे एक्झिट पोलचे सर्व्हे जाहीर होण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्याची विधानसभेची लढत प्रामुख्याने महाविकास आघाडी आणि महायुतीतच झाली. बसपा, सपा, मनसे, बच्चू कडूंचा प्रहार, स्वाभिमानी, स्वराज्य, वंचित बहुजन आघाडी अशा विविध लहान-मोठ्या पक्षांनीदेखील निवडणुकीत आपले उमेदवार उभे केले होते. सध्याचे राजकीय वातावरण पाहता कोणत्याही एका पक्षाला लोकसभा निवडणुकीत अथवा त्या त्या राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर बहुमत मिळविणे अवघड आहे. त्यामुळे युती, आघाड्या करून सत्ता मिळविणे अथवा सत्तेच्या जवळपास जाणे शक्य होत असते.महाराष्ट्रातही महायुतीमध्ये भाजपा, शिंदे गटाची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी या तीन प्रमुख पक्षांचा समावेश आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना या तीन पक्षांचा समावेश आहे. महाविकास आघाडी व महायुतीमध्ये अन्य लहान-मोठ्या सहयोगी पक्षांचा समावेश आहे. एक्झिट पोलच्या सर्व्हेमध्ये राज्यामध्ये पुन्हा महायुती सत्तेवर येणार असल्याचा दावा केला जात आहे. एक- दोन सर्व्हेमध्ये महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नक्की सत्ता कोणाची येणार, कोणाचे किती आमदार निवडून येणार, हे शनिवारीच स्पष्ट होणार. एक्झिट पोलचा सर्व्हे म्हणजे निवडणूक निकाल नव्हे, तो एक अंदाज असतो. अनेकदा सर्व्हे खरे, तर अनेकदा खोटेही ठरतात. मागे झालेल्या जम्मू-काश्मीर व हरियाणाच्या निवडणुकीमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये भाजपाची तर हरियाणामध्ये काँग्रेसची सत्ता येणार असल्याचा दावा एक्झिट पोलने केला होता. मात्र निवडणूक निकाल लागल्यावर सर्व्हे खोटे असल्याचे उघड झाले. हरियाणामध्ये भाजपाची सत्ता आली, तर जम्मू-काश्मीरची सत्ता भाजपाला मिळाली नाही. त्यामुळे सर्व्हेचे अंदाज काहीही सांगत असले तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती शनिवारी स्पष्ट होणार.

मागील विधानसभा निवडणूक निकालानंतर घडलेल्या राजकीय घडामोडी पाहता महाविकास आघाडीतील एक घटक आणि महायुतीमधील एक घटक एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याची शक्यताही राजकीय क्षेत्रांत व्यक्त केली जात आहे. कोणाचे किती आमदार जास्त निवडून येतात आणि मुख्यमंत्री पद मिळविण्यासाठी कोण किती महत्त्वाकांक्षी आहे, यावरही सत्तेची समीकरणे बदलू शकतात. निवडणुका लढेपर्यंत एकत्र असणारे पक्ष मतमोजणीनंतर सत्तासंपादन करताना एकत्र असतीलच याची कोणी खात्री देऊ शकत नाही. मागील सभागृहाने तीन राज्य सरकारे पाहिली आहेत. त्यामुळे आज आपल्यासोबत असणारा उद्या असेलच याची खात्री देता येत नाही. २०१९ सालची निवडणूक भाजपा आणि तत्कालीन एकसंध शिवसेनेने एकत्र लढविली. काँग्रेस-राष्ट्रवादीने निवडणूक एकत्रित लढविली; परंतु निकाल लागताच शिवसेनेने मुख्यमंत्री पदाचा दावा केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या नेतृत्वाखाली भाजपाच्या देवेंद्र फडणवीसांसोबत सत्तेमध्ये सहभागी झाली. त्यानंतर शरद पवारांनी अशा सरकारविषयी नाराजी व्यक्त करताच अजित पवार बॅकफूटवर आले. त्यानंतर शिवसेनेने सत्तेसाठी व मुख्यमंत्रीपदासाठी भाजपाची साथ सोडत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची संगत धरत महाविकास आघाडीची सत्ता आली. पुढे एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड करत सत्तेतून बाहेर आले. यावेळी अपक्ष १० आमदारांनीही त्यांना साथ दिली. त्यामुळे शिंदे-फडणवीसांचे सरकार सत्तेवर आले.मागील पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रीय जनतेने तीन सरकारे पाहिली. तीन सरकारमध्ये काही मंत्र्यांचे चेहरे मात्र कायम राहिल्याने सरकारे याच लोकांसाठी बदलली आहेत काय, असा उपहासात्मक प्रश्नही राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. एक्झिट पोलने महायुतीचे सरकार सत्तेवर येणार असल्याचे आणि महाविकास आघाडीला सत्ता मिळणार नसल्याचे संकेत देऊनही महायुतीकडून जल्लोष साजरा केला जात नाही आणि महाआघाडीकडे निराशा पसरलेली नाही. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांतील विधानसभा निवडणूक निकालांबाबतच्या एक्झिट पोलच्या सर्व्हेबाबत उलटेच फासे पडल्याने महाविकास आघाडी व महायुती सर्वेच्या अंदाजाकडे फारशा गांभीर्याने पाहत नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे महिला वर्गाचे मतदान महायुतीलाच झाले असल्याचे महायुतीकडून सांगण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षांनी दिलेले उमेदवारही महत्त्वाचे असतात. अलीकडच्या काळात पक्षाला पाहून मतदान करण्याचे दिवस इतिहासजमा झाले. त्यामुळे चांगले उमेदवार देणे, हा त्या पक्षांसाठी मतदारसंघामध्ये जमेची बाजू

ठरणार आहे.बुधवारी मतदान संपले. शनिवारी मतमोजणी होणार आहे. उमेदवारांनी मतदारसंघामध्ये २० ते २२ दिवस जंग जंग पछाडले होते. मतदारसंघातल्या प्रत्येक मतदारांशी संपर्क व सुसंवाद साधण्यासाठी जीवाचे रान केले होते. मात्र मतदान संपताच अवघ्या काही मिनिटांमध्ये एक्झिट पोलचे निकाल जाहीर होत असतात. पक्ष, उमेदवार, कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मतदान संपल्यावर अंदाज बांधण्यासाठी एक-दोन तासांचा कालावधी जातो. मतदारसंघातील प्रत्येक यादीचा अंदाज घेऊन निकालाबाबतचा संभाव्य अंदाज बांधला जातो. ज्यांनी मतदान प्रक्रिया राबविताना मतदारांशी संपर्क केला, त्यांना काही अवधी लागतो. मात्र निवडणूक निकालाबाबत सर्व्हे जाहीर करणारे घटक मात्र अवघ्या काही सेकदांमध्ये कसा अंदाज व्यक्त करू शकतात? याबाबत गौडबंगाल कायम आहे. मतदान झाले आणि सआता निकाल येणे बाकी असल्याने निवडणूक लढविणारे घटक व त्यांचे कार्यकर्ते 'गॅस'वर आहेत. निकाल जाहीर होण्यास अजून काही तासांचा कालावधी असला तरी निकालाबाबत सर्वांना कमालीची उत्सुकता लागून राहिली आहे. त्यातच बहुमतापासून काही पावलांवर समीकरणे अडखळल्याने सत्ता स्थापनेसाठी अपक्षांची रसद आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांशी संपर्क साधण्यास महाविकास आघाडीच्या तसेच महायुतीच्या घटकांनी सुरुवात केली आहे. निवडणूक निकाल लागण्यापूर्वी मतदारसंघातील आघाडीवरूनच सत्ता संपादनाचा कल स्पष्ट होणार आहे. सत्तेबाबत महाविकास आघाडी व महायुती दोघेही आशावादी आहेत. अपक्षांच्या पाठिंब्याची गरज लागल्यास त्यांचीही दोन्ही घटकांना मनधरणी करावी लागणार आहे.

# स्कॅलपिंग अर्थात डे ट्रेडिंग

स्कॅल्पिंग ही एक ट्रेडिंग शैली आहे. स्कॅल्पिंग हा एक शब्द आहे ज्याचा वापर डे ट्रेडिंगमध्ये लहान नफ्यातून उच्च व्हॉल्यूम कमावण्याच्या धोरणासाठी केला जातो. उदा. शेअर्स, इंडेक्स, कमोडिटी, करन्सी. येथे सोयीसाठी शेअर्स विचारात घेतले आहेत. भावात पडणाऱ्या छोट्याशा फरकाचा लाभ डे ट्रेडर्सकडून मिळवला जातो. एक किंवा त्याहून अधिक कंपन्यांच्या शेअर्सचे अनेक छोटे-छोटे ट्रेंड दिवसभरात घेतले जातात.शेअर बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे गुंतवणूकदार आहेत. ते करीत असलेल्या सर्व व्यवहारांना ट्रेडिंग असे म्हटले जाते. त्यांच्या गुंतवणूक करण्याच्या कालावधीवरून ते अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन गुंतवणूकदार आहेत असे समजले जाते. या कालावधीची निश्चित सीमारेषा नाही. आयकर कायद्यानुसार शेअर्समध्ये किमान एक दिवस ते एक वर्ष या कालावधीकरता केलेली गुंतवणूक अल्पकालीन तर त्याहून अधिक कालावधीसाठी केलेली गुंतवणूक ही दीर्घकालीन गुंतवणूक समजण्यात येते, त्यावर सवलतीच्या दराने कर आकारणी होते. त्यामुळेच काही व्यक्ती हिशोबी जोखीम (उरश्रर्लीश्ररींशव ठळीज्ञ) घेऊन भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यासाठी तयार होतात. व्यक्ती जितकी जास्त जोखीम घेऊ शकते त्यावर नफा किंवा नुकसान कमी अधिक होण्याची शक्यता असते. काही लोक आपले व्यवहार त्याच कामकाजाच्या दिवसात पूर्ण करतात त्यास डे ट्रेडिंग म्हणतात. त्यांचा गुंतवणूक करण्याचा कालावधी हा एका सेकंदाचा छोटा भाग ते पूर्ण कामकाजाचा दिवस असा असतो. भावातील फरकाचा लाभ उठवून कमीत कमी वेळात अल्प भांडवलावर अधिक नफा मिळवणे हे त्यांचे उद्दिष्ट असते. यातून मिळालेले उत्पन्न हे अन्य मार्गाने मिळालेले उत्पन्न समजून त्यावर नियमितदराने कर आकारणी होते. एखाद्या व्यक्तीचा शेअर्स खरेदी विक्री करणे हाच व्यवसाय असल्यास त्यास कायद्याने उपलब्ध असलेल्या व्यावसायिक खर्चाच्या वजावटी घेता येतात. पूर्वी या संबंधात अनेक वाद निर्माण झाल्याने त्यावर उपाय म्हणून शेअर खरेदी विक्री करणे ही गुंतवणूक आहे की व्यवसाय हे जाहीर करण्याचे स्वातंत्र्य करदात्यांना

मिळाले आहे.

आज आपण स्कॅलपिंग म्हणजे काय हे जाणून घेणार आहोत. ही एक डे ट्रेडिंगचीच पद्धत आहे. ज्या ज्या मालमत्ता प्रकारात उदा शेअर्स, इंडेक्स, कमोडिटी, करन्सी डे ट्रेडिंग होऊ शकते, त्यात स्कॅल्पिंग करता येते. उदा. शेअर्स, इंडेक्स, कमोडिटी, करन्सी. येथे सोयीसाठी शेअर्स विचारात घेतले आहेत. भावात पडणाऱ्या छोट्याशा फरकाचा लाभ डे ट्रेडर्सकडून मिळवला जातो. एक




किंवा त्याहून अधिक कंपन्यांच्या शेअर्सचे अनेक छोटे छोटे ट्रेंड दिवसभरात घेतले जातात. सकाळी मार्केट चालू झाल्यावर शेअर्स खरेदी अथवा विक्री करून आपले उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत किंवा पोझिशन स्क्वेअर अप करण्याच्या वेळेपर्यंत अथवा स्टॉपलॉस हिट होईपर्यंत वाट पाहणे त्यांना मान्य असते. आपला व्यवहार ते चुकूनही डिलिव्हरीमध्ये बदलून घेत नाहीत. त्यांचे टार्गेट आणि स्टॉपलॉस हे अन्य डे ट्रेडर्सच्या तुलनेत अत्यंत छोटे असतात. त्याचे गणिताचे ज्ञान पक्के असते भावात किती फरक पडला की आपल्याला सर्व खर्च वजा जाऊन फायदा होईल (ईशरज्ञर्शींशप)अथवा तोटा होईल हे त्यांना निश्चित माहिती असते.

या पद्धतीचे फायदे-तोटे असे -

**फायदे :**

व्यवहार संख्या अधिक त्यामुळे मोठ्या प्रमाणात नफा होण्याची शक्यता.

स्टॉप लॉसचा वापर करीत असल्याने व्यवहार जोखीम कमी.

बाजार दिशेनुसार व्यवहारातली लवचिकता.

बाजाराकडे लक्ष ठेवून असल्याने व्यवहारांकडे नावीन्यपूर्ण पद्धतीने पाहण्याची दृष्टी.

**तोटे :**

ट्रेड विरोधात गेल्यास जादा जोखीम.

ब्रोकरेज आणि अन्य चार्जेस अधिक द्यावे लागणे.

पूर्ण लक्ष ठेवावे लागत असल्याने अधिक वेळ घेणारे.

मानसिक ताण येण्याची शक्यता.

बाजारातील अस्थिरता त्यामुळे निर्णय चुकण्याची शक्यता.

कमी व्यवहार होणाऱ्या शेअर्समध्ये तरलतेचा अभाव.

**स्कॅलपिंगची वैशिष्ट्ये :**

अत्यल्प व्यवहार कालावधी - हे व्यवहार काही सेकंद ते काही मिनिटे या कालावधीचे असतात.

अधिक व्यवहार वारंवारता - कालावधी कमी असल्याने एक वा अनेक कंपन्यांच्या शेअर्समध्ये वारंवार एकसारखे अधिक व्यवहार केले जातात.

अत्यल्प नफा उद्दिष्ट - यातील बहुतेक सर्व व्यवहार अत्यल्प नफा मिळवण्यासाठी केले जातात.

तांत्रिक विश्लेषणाचा वापर - स्कॅल्पिंग व्यवहार करताना तांत्रिक विश्लेषण उपयोगी पडत असल्याने स्कॅलपिंगर त्याचा प्रामुख्याने वापर करतात.

**लोकप्रिय स्कॅलपिंग तंत्रे :**

रेंज ट्रेडिंग - शेअर्सची किंमत पातळी ओळखून त्याच दरम्यान व्यवहार करणे.

ट्रेंड फॉलोइंग - शेअर्सचा कल ओळखून त्यानुसार व्यवहार करणे.

ब्रेकआउट ट्रेडिंग - अचानक होणाऱ्या भावातील बदल ओळखून व्यवहार करणे.

मिन रिव्हर्शन - शेअर्सची किंमत कालांतराने सरासरी किमतीत बदलते ते ओळखून व्यवहार करणे.

**स्कॅलपिंगसाठी आवश्यक कौशल्ये :**

बाजार ज्ञान - स्कॅलपिंग म्हणून काम करण्यासाठी बाजाराचे सखोल ज्ञान असणे गरजेचे आहे.

तांत्रिक विश्लेषण - निर्णय घेण्यासाठी विविध तांत्रिक गोष्टींचा विचार केला जात असल्याने या विषयाचे ज्ञान असणे गरजेचे आहे.

जोखीम व्यवस्थापन - कोणत्याही गुंतवणुकीसाठी हे आवश्यक असल्याने स्कॅलपिंगसाठीही त्याची गरज आहे.

शिस्त - आपल्या गुंतवणूक धोरणाचे तंतोतंत पालन करण्याची शिस्त अंगीकारायला हवी.

तत्काळ निर्णय घेण्याची क्षमता - भाव क्षणार्धात वरखाली होत असल्याने निर्णय झटपट घेण्याचे कौशल्य असायला हवे. यात एक चूक म्हणजे आर्थिक नुकसानच.

**स्कॅलपिंग सुरू करण्यासाठी आवश्यक गोष्टी :**

योग्य ट्रेडिंग प्लॅटफॉर्म - किमान ब्रोकरेज लागेल ज्यामुळे व्यवहार खर्च कमी होईल असा ब्रोकर निवडणे.

स्निश्चित असा ट्रेडिंग प्लॅन - व्यवहार करताना कोणत्या पातळीवर करायचा स्टॉप लॉस एन्ट्री एक्सिट कुठे घेणार या बद्धल संदिग्धता नसावी.

सराव मंच - सरावासाठी अनेक ट्रेडिंग प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत यात प्रत्यक्ष पैशांशी संबंध येत नसल्याने व्यवहार करण्यात कोणताही धोका नाही.

व्यवहार पातळी - सुरुवातीस छोटे आणि कमी संख्येने व्यवहार करून त्यांचे प्रमाण वाढवावे.डे ट्रेडिंग हे दुय्यम दर्जाचे आहे असे गुंतवणूक तज्ज्ञ समजतात, असे असले तरी ही एक गुंतवणूक करण्याची सर्वमान्य पद्धत आहे. डे ट्रेडर्स असल्यामुळे बाजाराचा भाव फलक सतत हलता राहतो, व्यवहार संख्या वाढते. शेअर बाजारात बहुसंख्य व्यवहार याच प्रकारात होतात. सरकारला कर मिळतो. स्कॅलपिंग करण्यासाठी जोखीम - प्रतिफळ संबंध (Risk Reward Ratio) याचबरोबर ट्रेडिंगवर समर्पितता (Delegation), शिस्त (Discipline) आणि सतत शिकत राहण्याची इच्छाशक्ती असण्याची गरज आहे. योग्य माहितीअभावी डे ट्रेडिंग करणे अत्यंत जोखमीचे आहे. यासाठी आपल्या तज्ज्ञ सल्लागाराचे मत जाणून घ्या.

# महाराष्ट्रात महायुद्ध

यंदाच्या निवडणुकीत एकूण ४१३६ उमेदवार मैदानात असून २० लाख ९३ हजार युवा मतदार प्रथमच आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या लाडकी बहीण योजनेमुळे यंदाची निवडणूक सुपर हिट ठरली, तर भाजपाच्या ङ्गबटेंगे तो कटेंगेफ या घोषणेमुळे प्रचारयुद्ध शिगेला पोहोचले. ङ्गएक है तो सेफ हैफ, व्होट जिहाद, मतांचे धर्मयुद्ध अशा घोषणांनी वातावरणही तापले. गद्दार विरुद्ध निष्ठावान, महायुती विरुद्ध महाआघाडी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असे यंदाच्या महायुद्धाला स्वरूप आले आहे. शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह जरी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला दिले असले तरी त्यावर हक्क कुणाचा शिंदेंचा की ठाकरेंचा याचा कौल या निवडणुकीत मतदार देणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाने जरी अजित पवार यांच्या पक्षाला दिले असले तरी त्यावर खरा हक्क कुणाचा पक्षाचे संस्थापक शरद पवारांचा की, त्यांच्याविरोधात बंड करणाऱ्या अजितदादांचा याचा निर्णय जनतेच्या न्यायालयात होणार आहे.

या निवडणुकीत जसे एकनाथ शिंदे व अजितदादा यांची कसोटी आहे तसेच पाच वर्षांपूर्वी मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन असा घोषा लावणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांचेही करिअर निकालानंतर ठरणार आहे.सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने महायुतीवर महाराष्ट्रात मात केली. राज्यातील मतदारांनी महाआघाडीचे ३१ खासदार निवडून दिले व महायुतीचे केवळ ९ खासदार लोकसभेत पाठवले. आता विधानसभा कोणाच्या ताब्यात देणार, हे आज राज्यातील मतदार ठरवणार आहे. लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्यानंतर महायुती सरकारचे धाबे दणाणले. लोकसभेचे वातावरण विधानसभेला राहिले, तर राज्याची सत्ता गमवावी लागेल, हे भाजपालाही कळून चुकले. एकनाथ शिंदे यांनी ङ्गमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणफयोजना लागू करून मास्टर स्ट्रोक मारला आणि राज्यातील अडीच कोटी लाडक्या बहिणींची व्होट बँक आपल्याकडे म्हणजे महायुतीकडे वळवून घेतली.

राज्यातील लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात दरमहा १५०० रुपये प्रमाणे तीन महिन्यांचे पैसे जमा झाल्याने त्यांचा विश्वास शिंदे सरकारवर बसला आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला सत्ता मिळाल्यावर लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याचा वादाही शिंदे-फडणवीस व अजिदादांनी केला आहे. लाडक्या बहिणींचा महायुतीला मिळत असलेला उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद पाहून महाआघाडीनेही महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना दरमहा ३००० रुपये व मोफत बस प्रवासाचे गाजर दाखवले आहे. महादेव जानकर हे भाजपापासून दूर आहेत. लोकसभा निकालानंतर महायुतीला लाडकी बहीण अचानक कशी आठवली असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. लाडकी बहीण यंदाच्या निवडणुकीत गेम चेंजर ठरणार असे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी अशी भाजपाने दिग्गज नेत्यांची फौज प्रचारात उतरवली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी वड्रा, माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोट, माजी केंद्रीयमंत्री सचिन पायलट, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार अशी बड्या नेत्यांची टीम काँग्रेसने आणली होती. यंदाच्या निवडणुकीत उबाठा सेना आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो मोठ्या फलकांवर व जाहिरातींवर लावून प्रचार केला.शिवसेनाप्रमुखांचे नाव घेऊन दोन्ही पक्षांनी मते मागितली. उद्योगपती गौतम अदानी आणि त्यांना मिळालेला धारावी पुनर्विकास प्रकल्प हा प्रचारात धारदार मुद्दा होता. उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व काँग्रेसचे सर्वेसर्वा राहुल गांधी यांनी धारावी प्रकल्पाचा उल्लेख करून अदानी व भाजपा यांचे कसे साटेलोटे आहेत याचा जप केला. राहुल गांधींनी तर अदानी व मोदींचे एकमेकांना नमस्कार करतानाचे फोटोही दाखवले. खरे तर लहान-मोठे उद्योगपती व उद्योजक सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना भेटत असतात. नेतेही त्यांच्याशी चांगले संबंध ठेऊन असतात मग निवडूक प्रचारात अदानींना टार्गेट करणे हे कितपत योग्य आहे? स्वत: अजित पवार यांनी २०१९ मध्ये राज्यात भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस असे सरकार स्थापन करण्यासाठी दिल्लीत अदानींच्या निवासस्थानी अमित शहांच्या उपस्थितीत बैठक झाल्याचा गौप्यस्फोट एका मुलाखतीत केला. अमित शहा व शरद पवार यांची नावे त्यांनी घेतल्याने दुसऱ्याच दिवशी घुमजाव करण्याची पाळी त्यांच्यावर आली. आपण सत्तेवर आल्यानंतर अदानींना मिळालेले धारावीचे कंत्राट रद्द करू असे ठाकरे यांनी अनेक जाहीर सभांमधून सांगितले आहे. महाआघाडी सत्तेवर आल्यास सूडबुद्धीने सरकार चालवणार का? अजितदादांवर भाजपाने आणि स्वत: पंतप्रधानांनी ७० हजार कोटी सिंचन घोटाळा झाल्याचे आरोप केले, त्यांना जेलमध्ये टाकू असे २०१९ मध्ये भाजपा नेते सांगत होते, मग हा आरोप खोटा होता का, अजितदादा स्वच्छ झाले का, याचे उत्तर भाजपाने कधी दिले नाही. गेल्या दोन वर्षांत शिवसेनेचे व राष्ट्रवादीचे मिळून ८० आमदार फुटले.पक्षांतर बंदीचा कायदा असूनही त्यांची फूट कायदेशीर ठरवली गेली व बंडखोरांच्या गटांना निवडणूक आयोगाने मान्यता दिली. महाराष्ट्रात पक्षांतर बंदीचा कायदा गुंडाळून ठेवलाय का? सर्वोच्च न्यायालयात ही तारीख पे तारीख चालू आहे. गेल्या पाच वर्षांत राज्यात राजकारणाचा चिखल झाला त्याला जबाबदार कोण, त्याची शिक्षा कोणाला, कोणाला निवडून दिले व ते नंतर कुठे गेले हे मतदारांना समजत नाही का? दोन मोठ्या प्रादेशिक पक्षांत फूट पडल्यानंतर राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रथमच मतदान होत आहे. ५ वर्षांत जे मतदारांनी अनुभवले त्याचा मतदान करताना ते निश्चितच विचार करतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यात पायाला भिंगरी लावल्यासारखे फिरले. मेट्रो, बुलेट ट्रेन, जलशिवार, समृद्धी मार्ग, कोस्टल रोड, अटल सेतू, हे सर्व मोठे प्रकल्प ठाकरे सरकारने रोखले होते, त्यांना आपण गती दिली असा त्यांनी दावा केलाय. पालघर हत्याकांडाची चौकशी ठाकरे सरकारने थांबवली, कोविडच्या नावाखाली धार्मिक सणांवर ठाकरे सरकारच्या काळात निर्बंध लादले गेले, महापालिकेत मोठा खिचडी घोटाळा त्यांच्या काळातच झाला. मुख्यमंत्री असताना मंत्रालयात न जाता फेसबुक लाईव्ह करीत बसले. अशा आरोपांचा भडीमार त्यांनी ठाकरेंवर केला. त्याला प्रत्युत्तरही महाआघाडीने दिलाच. हिट अ‍ॅण्ड रनमध्ये देशात महाराष्ट्र दुसरा आहे. लाडक्या मित्राला शिंदे सरकारने (धारावी) २ लाख कोटींची भेट दिली, गुन्हेगारीत महाराष्ट्र देशात दुसरा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यातही भ्रष्टाचार, वेदांत फॉक्सकॉन, टाटा एअर बस, आंतरराष्ट्रीय वित्तिय केंद्र, हिरा उद्योग, असे साडेसात लाख कोटी गुंतवणुकीचे व ५ लाख रोजगार देणारे महाराष्ट्रातील प्रकल्प मोदी सरकारने दुसऱ्या राज्यात पळवले.अडीच वर्षांत राज्यात २४ हजार शेतकरी आत्महत्या झाल्या. अशा आरोप-प्रत्यारोपांनी महाराष्ट्र गेले महिनाभर ढवळून निघाला. विधानसभा निवडणुकीत राम मंदिराचा मुद्दा कोणी आणला नाही, पण ३७० वे कलम आपण कसे रद्द केले असे मोदी-शहांनी ठासून सांगितले. वाढते नागरीकरण, वाढती लोकसंख्या, नागरी सुविधांवर पडणारा ताण, परप्रांतीयांचे लोंढे, वाढलेले विजेचे दर, अपुरा पाणीपुरवठा, शेतकरी आत्महत्या, हमी भाव मिळत नसल्याने असलेले शेतकरी असंतोष, शहरातील वाहतुकीची कोंडी, शाळा प्रवेशांची डोकेदुखी, फेरीवाल्यांचे अतिक्रमण, उपनगरी गाड्यांतील अफाट गर्दी, बेकायदा बांधकामे, घरांच्या गगनाला भिडणाऱ्या किमती, सतत वाढणारी झोपडपट्टी, महागाई व सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार अशा मुद्द्यांवर प्रचारात चर्चा झाली नाही. बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, गद्दारांना पाडा, राहुल गांधी फेक है, आधी मनसे आता गुनसे, लढणारा महाराष्ट्र होऊ, घरात बसणारा नाही अशा मुद्द्यांभोवती निवडणूक फिरत राहिली. माजी गृहमंत्री अनिल देशमुखांवर काटोल येथे झालेला हल्ला व भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे त्यांना विरोधी पक्षाने नालासोपारा येथे घातलेला घेराव अशा घटना महाराष्ट्राला भूषणावह नाहीत. अमित शहांनी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीचे १६० पेक्षा जास्त आमदार निवडून येतील, असे भाकीत वर्तवले आहे. लोकसभा निवडणुकीला तर भाजपाची अब की बार ४०० पार अशी घोषणा होती. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात, मला मत म्हणजे भाजपाला नव्हे, महायुतीला मत. महाराष्ट्रातील महायुद्ध कोण जिंकणार, कोणाचे सरकार स्थापन होणार याची सर्व देशाला उत्सुकता आहे. आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नाही असे एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस या दोघांनीही जाहीर केले आहे. त्यामुळे निकालानंतर पुढे काय होणार याचे गूढ वाढले आहे.

# राष्ट्रीय सचिव असलेल्या पंकजाताई,अपक्ष उमेदवाराचे समर्थन करून तुम्ही मला धोका द्यायला नको होता;आ.सुरेश धस यांचा घणाघात;आष्टीत कोणी कितीबी येऊ द्या,एकच बास चा नारा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या पंकजाताई मुंडे यांनी चुकीच्या माणसाचे ऐकून भीमराव धोंडे या अपक्ष उमेदवाराला विजयी करा असे फोन करून भाजपा उमेदवार असलेल्या सुरेश धस यांना पराभूत करा असा प्रचार करून मला धोका द्यायला नको होता असा घणाघात आष्टी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार आ.सुरेश धस यांनी केला आष्टी येथील विजयी सभेमध्ये ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर उद्धव दरेकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,विद्यमान नगराध्यक्ष जिया बेग, पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,शिरूर नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे प्रदेश सचिव अभिजीत शेंडगे,ज्ञानेश्वर माऊली जरांगे,दिव्यांग संघटनेचे जेष्ठ नेते शरिषभाऊ थोरवे,यशवंत खंडागळे,अरुण भैय्या निकाळजे उपस्थित होते पुढे बोलताना आ.सुरेश धस पुढे म्हणाले की,मी माझ्या राजकीय आयुष्यात कधीही जात-पात धर्म पाहून राजकारण केले नाही आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील उर्वरित विकास कामांसाठी मी कटिबद्ध असून खुंटेफळ साठवण तलावामध्ये १.६८ टीएमसी पाणी आले आहे, त्यामध्ये आणखी ४.०० टीएमसी पाणी आणून शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध करावयाचे आहे,पैठण पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावायचा आहे,शिरूर आणि पाटोदा तालुक्यातील दुष्काळी भागासाठी गोदावरी खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे पाणी जायकवाडी तलावामध्ये आणून तिथून या दोन्ही तालुक्यासाठी पाणी आणावयाचे आहे,राज्यमार्ग क्रमांक २ वरील वेडी वाकडी वळणे काढून दर्जेदार करावयाचा आहे,पाटोदा तालुक्यातील तीन मध्यम प्रकल्पांच्या उंची वाढवायची आहे,सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्ग वरील आष्टी तालुक्यातील चुकीचे भूसंपादन झालेले असून त्याची चौकशी लावून शेतकऱ्यांच्या जमिनीवर लबाडांना पैसे मिळू देणार नाही, तसेच सुरत चेन्नई या मार्गाला संभाजीनगर पुणे या महामार्गाला जोडण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच बीड ते नगर हा रस्ता १२ मीटर सिमेंट कॉंक्रेट चा करावयाचा आहे आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हेळसांड होऊ नये म्हणून लवकरच साखर कारखाना उभारणी करणार आहे, वन्यजीव अभयारण्या मध्ये ४२०० हेक्टर क्षेत्रा वर भारतीय प्रजातीची वृक्षांची लागवड करण्यात येऊन त्या ठिकाणी पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येतील कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सुशोभीकरण करण्यात येऊन चौकाच्या मध्ये बसवण्यात येईल, डोंगर भागातील शेतकऱ्यांना रानडुकरापासून संरक्षण होईल यावर उपाययोजना करण्यात येतील, असे सांगून निवडणुकीतील अनुभव विषयी सांगताना ते म्हणाले की, माझा पराभव व्हावा यासाठी कटकारस्थान करण्यात आले, लोकसभा निवडणुकीत मी पंकजाताई मुंडे यांचे मनापासून आणि प्रामाणिकपणे काम करून स्वतःच्या मराठा समाजाला अंगावर घेण्याचे काम केले बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्यांना काळे झेंडे दाखवण्याचे काम केले परंतु माझ्यामुळे आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यामध्ये काळे झेंडे दाखवले गेले नाहीत,मराठा समाजाची प्रचंड नाराजी असताना देखील मतदारसंघांमध्ये ३२ हजारांचे मताधिक्य दिले असूनही चुकीच्या माणसांचे ऐकून पंकजाताई मुंडे यांनी मला धोका दिला, हे माझ्या हृदयाला लागले असून माझ्या वडिलांच्या निधना इतके दुःख मला झाले आहे धनंजय मुंडे यांच्या विषयी बोलताना ते म्हणाले त्यांचा पक्ष वेगळा आहे त्यांच्याकडून मला अपेक्षा नव्हती परंतु तरीही त्यांनी काही कार्यकर्त्यांनी मदत करण्यास सांगितले त्यांची मदत मला झाली आहे राजकारणात दिलेला शब्द पाळावा लागतो,पंकजाताई यांच्यासाठी मी २० १७ मध्ये जिल्हा परिषद ताब्यात देताना माझ्या राष्ट्रवादी पक्षाचे ५ जि.प.सदस्यांचे बलिदान केले असून पक्षाने त्यांना अपात्र केले हा अपात्रतेचा शिक्का घेऊन माझे हे खंबीर कार्यकर्ते आपले काम करत होते त्यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष हे पद सर्वसाधारण असूनही सविता विजय गोल्हार यांना जिल्हा परिषद अध्यक्षपदी बसवून मी मराठा समाजाचा रोष ओढवून घेतला याची जाणीव विजय गोल्हार यांनी ठेवली नाही,पंकजाताई, आपणा सोबत फिरणाऱ्या माणसांविषयी थोडा विचार करावा,आपण आपला मार्गदर्शक बदलावा असे सांगून आ.सुरेश धस पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांचे कार्यकर्ते २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रीतम ताई चे विरोधात काम करत होते तेव्हा हे ओबीसी नेते कुठे होते ?यांचे अर्धे आयुष्य झोपेत गेले आणखी कशाकशात गेले हे मी आता सांगत नाही परंतु मी मनात आणले तर त्यांचे उर्वरित आयुष्य जेलमध्ये जाईल परंतु माझी नियत तशी नाही, मागील विधानसभा निवडणुकीमध्ये भीमराव धोंडे हे पराभूत झाले त्यावेळी मी पैसे घेतले आणि ते परत केले नाही असा बालीश आरोप त्यांनी केला याबाबत त्यांनी भगवान गडावर, नारायण गडावर,तारकेश्वर गडावर, किंवा गहिनीनाथ गडावर वामन भाऊ यांच्या समाधीवर हात ठेवून शपथ घ्यावी असे आव्हान देऊन ते पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांच्या शिक्षण संस्थेतील संस्थेचे अधिकारी काय काय गैरप्रकार करत आहेत ? याची चौकशी करा आणि यापुढे त्यांनी त्यांचे वर्तन बदलावे असा सज्जड दम दिला बाळासाहेब आजबे यांचे विषयी बोलताना ते म्हणाले की, तुम्ही निवडून कसे आलात ? हे तुम्हालाच माहिती नाही त्यावेळी जयदत्त धस यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज असल्यास मला उमेदवारी नको असे माझ्या घरी येऊन म्हणाला होतात तुम्हाला १ लाख २६ हजार मते मिळाली होती ती सर्व तुमची आहेत असे सांगत होतात मग त्यातील १ लाख ५ हजार आता मते कुठे गेली ? असा सवाल करून ते म्हणाले की, आगामी पन्नास वर्षात आजबे आडनावाचा माणूस विधानसभा निवडणुकीत दिसणार नाही असे काम आपण पाच वर्षात केले आहे, केवळ पैसे मिळवून चालत नसते, लूट करून चालत नसते, राजकारणामध्ये माणसेही कमवावे लागत असतात असे सांगून बाळासाहेब आजबे आमच्या घराण्याच्या खोडावर घाव घालायला निघाले होते जनतेने त्यांना २१ हजार मते देऊन त्यांची लायकी दाखवली आहे त्यांना मी फरशी कुऱ्हाड आणून देतो त्यांनी कधीही रानात जाऊन घाव घालीत बसावे अशी मिश्किल टिपणी केली अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांनी मी भाजप उमेदवारी देवेंद्र फडणवीस यांचे कडून आणली आहे त्यामुळे माझ्यावर मराठा समाज नाराज होईल असा जाणीवपूर्वक प्रचार केला म्हणजे मला वंजारी समाजाकडून आणि मराठा समाजाकडून असा दोन्ही कडून विरोध होईल असे कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला परंतु मी गोपीनाथ मुंडे साहेबांचा चेला आहे शिकार करताना किड्या मकोड्याची करावयाची नसते तर वाघाची करायची असते, मी एवढा साधा सोपा नाही मी झुकणार नाही मोडेन पण वाकणार नाही या बाण्याचा असून मी आता पाच टर्म आमदार असल्यामुळे मी आता वरिष्ठ आहे, पंकजाताई मुंडे यांच्या पेक्षा मी दहा वर्षे राजकारणात सीनियर आहे तुम्ही माझ्याशी असे वर्तन करावयाला नको होते असे पुन्हा एकदा त्यांनी भावना विवश होऊन सांगितले आष्टी मतदार संघातील मराठा आणि वंजारी समाजाला बरोबर घेऊन मी काम केले आहे आणि करणार आहे यापूर्वी मी सर्वसाधारण जागेवर वंजारी समाजाच्या रेखा गोवर्धन सानप यांना पाटोदा पंचायत समितीच्या सभापती पद दिले त्याचबरोबर अनेक पदाधिकारी मी वंजारी धनगर माळी या इतर मागासवर्गीय समाजातील लोकांना दिले आहे या निवडणुकीमध्ये मला मराठा समाजा बरोबरच वंजारी समाजाने देखील भरभरून मते दिले असून धनगर समाजाने देखील ८५ टक्के मते दिले आहेत तसेच अनेक गावांमध्ये माळी समाजाने देखील मते दिले आहेत त्यामुळेच माझा विक्रमी मतांनी विजयी झाला असून मला १ लाख ४० हजार विक्रमी मते मिळाली आहेत असे सांगितलेओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी भीमराव धोंडे यांना विजयी करा असे आवाहन केले होते त्याबाबत टिपणी करताना सुरेश धस म्हणाले की लक्ष्मण हाके यांना माढा येथे ५००० मध्ये पडले आहेत त्यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील तीन लाख ८५००० मतांच्या एवढ्या मोठ्या मतदारसंघात कारभार करण्याचा विचार करू नये असे सांगितले.

# आमदार राहुल कुल यांची विजयी हॅट्रिक

## रमेश थोरात यांचा १३९०६ मतांनी केला पराभव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड (बबनराव धायतोंडे)




दौंड विधानसभा १९९ निवडणूक २०२४ चा निकाल समोर आला असून राज्यामध्ये पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन होत आहे. दौंड तालुक्यात विद्यमान आमदार राहुल कुल यांनी सलग तिसऱ्यांदा विजयी होत विजयाची हॅट्रिक केली असून तिन्ही वेळेसचे प्रतिस्पर्धी असलेले रमेश थोरात यांचा दारुण पराभव केला आहे. दौंड विधानसभेची निवडणूक अटीतटीची होणार असा अंदाज अनेक राजकीय जाणकारांनी व्यक्त केला होता,परंतु आमदार राहुल कुल यांनी पहिल्या फेरीपासून आघाडी घेत जवळपास १४ हजार मतांनी विजय खेचून आणला. दौंड विधानसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार राहुल कुल हे १३९०६ मतांनी विजयी झाले आहेत. महायुतीचे उमेदवार राहुल कुल आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे रमेश थोरात यांच्यात अटीतटीची लढत होईल असा तर्क अनेक जण लावत होते.परंतु राहुल कुल यांनी तालुक्यात केलेली विकास कामे,आरोग्य सेवेत तालुक्यातील जनतेची केलेली मदत,लाडक्या बहिणींना दिलेली भाऊबीज यामुळे एकतर्फी विजय संपादित करत अटीतटीच्या समजल्या जाणाऱ्या लढतीत राहुल कुल यांनी एकतर्फी बाजी मारली. दौंड मतदारसंघातील ३ लाख १९ हजार ३११ मतदारांपैकी २ लाख ३० हजार ७६६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता त्यामध्यच१ लाख १६ हजार ३८३ पुरुष तर त्याचबरोबर १ लाख १४ हजार ३८१ महिला मतदार यांचा समावेश होता. आज (ता.२३) सकाळी आठ वाजता दौंड शासकीय गोदाम येथे मतमोजणीस सुरवात झाली. सुरुवातीपासूनच महायुतीचे उमेदवार राहुल कुल यांनी निकालात आघाडी घेतली होती.अखेरच्या फेरी अखेर शरद पवार गटाचे उमेदवार रमेश थोरात यांचा १३९०६ मतांनी दणदणीत पराभव केला. आमदार राहुल कुल यांच्या विजयानंतर दौंड तालुक्यातील पूर्व भागातील खानवटे, खडकी, वाटलूज,राजेगाव, ईत्यादी अनेक गावांमध्ये विजय उत्सव साजरा करण्यात आला असून सर्वत्र गुलालाची उधळण करत मोठ्या प्रमाणात जल्लोष होत आहे.



नांदेड – लोकसभा पोट निवडणूक काँग्रेसचे रवींद्र चव्हाण विजयी घोषित/निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केली विजयाची घोषणा

लोहा कंधार विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार श्री प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांची श्री बाजीराव पाटील कळकेकर दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.



# कंधार लोहा मतदारसंघात प्रतापराव पाटील चिखलीकर विजयी फटाक्यांची आतषबाजी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

लोहा कंधार मतदारसंघातून प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा विजय होताच परिसरतील अनेक गावांत कार्यकर्त्यांनी जल्लोष करून फटाक्यांची आतषबाजी केली. कंधार लोहा विधानसभा मतदारसंघातील प्रतापराव पाटील चिखलीकर समर्थकांकडून फटाके फोडून आतषबाजी करण्यात आली. लोहा येथील मतमोजणी केंद्रातून सोशल मीडियावर मिळालेल्या आकडेवारी फेरीनिहाय मतांची संख्या मिळाल्याने कार्यकर्ते आनंद साजरा करत होते. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी जनतेतून बोलले जात होते प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा आवाज कळका व चिखली पर्यंत पोहोचला असून तो आवाज आता राज्याच्या राजधानीत मुंबई येथे पोहोचेला असल्याची चर्चा चालू होती.चिखलीकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सिल्लोडमध्ये राडा; मतमोजणी केंद्रावर गोंधळ, पोलिसांचा सौम्य लाठीचार्ज, कलेक्टर रवाना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)



मतदारसंघाच्या निकालावरून अफवा पसरल्याने मतमोजणी केंद्राच्या बाहेरील जमाव अनियंत्रित झाला. मतमोजणी देखील काही काळ बंद करण्यात आली, त्यानंतर सत्तार की बनकर यांच्यात कोण विजयी झाले याबाबत माहिती मिळत नसल्याने अचानक परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने पोलिसानी सौम्य लाठीचार्ज करत जमाव पांगवला. मतदारसंघात कलम १४४ लागू करण्यात आले असून स्वतः जिल्हाधिकारी दिलीप स्वामी सिल्लोडकडे रवाना झाले आहेत.निवडणूक निकालाच्या बाबतीत सोशल मीडियावरून अफवा पसरल्याने मतमोजणी केंद्रा भोवती मोठा जमाव जमला. त्यांनी गोंधळ घातला पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी बळाचा वापर करून लाठीचार्ज करत जमाव पांगवला. माजी उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी जमावाला शांत केले. तणाव व वाद वाढू नये म्हणून निवडणूक विभागाने मतमोजणी काहीकाळ थांबवली.

मतदारसंघात कलम १४४ लागू,

मतदारसंघात २५ व्या फेरीची मतमोजणी प्रक्रिया सुरू असताना बाहेर ठराविक उमेदवार विजयी झाल्याची अफवा पसरली. यामुळे जमावाने एकच जल्लोष सुरू झाला. मात्र, काहीनी अद्याप मतमोजणी सुरू असल्याचे सांगितल्याने अफवांचे पेव फुटले. त्यानंतर मतमोजणी केंद्राबाहेर मोठा जमाव जमला. परिस्थिती नियंत्रणासाठी सिल्लोडमध्ये पोलिसांचा मोठा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे.

# माझा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित-आ.विजयसिंह पंडित








■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

कार्यकर्त्यांचे परिश्रम, आदरणीय भैय्यासाहेब यांचे परफेक्ट नियोजन आणि मतदारांचा विश्वास यामुळे विजय मिळाला. आजचा विजय गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम स्वाभिमानी मतदारांना समर्पित करत आहे अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केली. या विजया मुळे आजवरचे सर्व राजकीय हिशोब चुकते केले आहेत. आदरणीय शिवाजीराव दादांचे स्वप्न साकारले आहे. मोठी जबाबदारी मतदारांनी दिली आहे ती सार्थ करण्याचा नक्की प्रयत्न करणार असल्याचे भावना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केली. गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित यांचा मोठा विजय झाल्यानंतर ते बोलत होते. गढी पासुन ते गेवराई शहरात भव्य मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी हा आनंद साजरा केला. विजयसिंह पंडित यांनी मतदारांसह नेत्यांचे आभार व्यक्त केले.

गेवराई विधानसभा मतदारसंघा साठी झालेल्या मतमोजणी साठी प्रारंभी पासूनच विजयसिंह पंडित यांनी मोठी आघाडी घेतली होती, ती शेवटपर्यंत कायम ठेवली आणि प्रत्येक फेरी अखेर ती वाढतच गेली. विजयसिंह पंडित यांना एकूण १,१६,१५१ मते मिळाली असून त्यांनी ४२,३९० मतांनी विजय मिळवला. मतमोजणी दरम्यान कार्यकर्ते आणि मतदार यांनी मोठा जल्लोष केला. गढी येथील मतमोजणी केंद्रापासून पासुन नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गेवराई शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद साजरा केला.

नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी हा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित केला आहे. कायम जनतेच्या सेवेत राहणार असल्याचे त्यांनी सांगून या निवडणूकीत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.यावेळी निवडणूक निरीक्षक लालटनपुई वॉंगचॉंग, निवडणूक निर्णय अधिकारी सतिश धुमाळ, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार संदिप खोमणे यांच्या हस्ते विजयसिंह पंडित यांना निवडणूकीत विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी निवडणूक निरिक्षक तथा संपर्क अधिकारी ज्ञानोबा मोकाटे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम मांडूरके यांच्या सह निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व निवडणुक कर्मचारी आणि अधिकारी यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी आभार मानले.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, माझ्या विजयामध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, ना. धनंजय मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांच्यासह मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा आणि मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि मतदार बंधू भगिनींचा मोठा वाटा आहे. मला तुम्ही भरभरून आशीर्वाद दिला मतदारसंघांमध्ये माझ्या विरोधात खूप मोठ्या प्रमाणावर अपप्रचार झाला, जात पात धर्म यामध्ये मला अडकवण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु मायबाप मतदारांनी जात पात धर्म या पलीकडे जाऊन मला आशीर्वाद दिले. कार्यकर्त्यांनी आपणच उमेदवार आहोत या भावनेतून काम केल्यामुळे मी हा विजय मिळवू शकलो. शिवछत्र परिवार जात पात धर्म यापलीकडे जाऊन काम करतो हे तुम्ही या निमित्ताने दाखवून दिले आहे. यापुढील काळात आपण सकारात्मक काम करुन मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे सांगून गेवराई विधानसभा मतदारसंघातीलया सर्व समाजातील मतदार बांधवांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याला मी तडा जाऊ देणार नाही. येणाऱ्या पाच वर्षांमध्ये मला मिळालेल्या संधीचे मी सोने करेल असेही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम मतदार बंधू-भगिनींनी विजयवर विश्वास टाकला त्याबद्दल त्यांचे मी जाहीर आभार मानतो. आ. विजयसिंह पंडित यांचा हा विजय ऐतिहासिक आहे या विजयामुळे मला मनस्वी आनंद होतो आहे. आज १९९५ च्या निवडणुकीची मला आठवण झाली. आज या निमित्ताने सगळे हिशोब चुकते झाले. निवडणुकीच्या निमित्ताने दिलेला शब्द पूर्ण करण्याचा विश्वास देतो. या ऐतिहासिक निकालामुळे शिवछत्र परिवाराच्या सातबारावर तुम्ही तुमचे नाव कोरले आहे, तेव्हा यापुढे विकासाची कामे तर होतीलच परंतु सामान्य माणसांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह कार्यकर्त्यांनी विजयी रॅली काढली. गढी ते गेवराई निघालेल्या या रॅलीमध्ये कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. विजयसिंह पंडित यांच्या विजयानंतर गेवराई आणि बीड येथील निवासस्थानी कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित जयभवानी कारखान्याचे संचालक जयसिंग पंडित यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले.



लोकनेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांची लोहा कंधार विधान सभेचे आमदार म्हणून निवड झाल्या बद्दल मनस्वी शुभेच्छा देताना ज्ञानेश्वर पाटील शिंदे येलूरकर , व्यंकटराव पाटील गोजेगावकर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.(छाया – बाजीराव गायकवाड पाटील)



भोकरदन जाफराबाद मतदार संघाचे भाजपाचे विद्यमान आमदार संतोष पाटील दानवे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार चंद्रकांत पाटील दानवे यांचा पराभव केला भाजपाचे विद्यमान आमदार संतोष पाटील दानवे यांचा विजय घोषित होताच कार्यकर्त्यांनी व लाडक्या बहिणींनी जल्लोष साजरा केला... लोकनेता न्यूज नेटवर्क राम शिंदे भोकरदन



**झाडे लावा झाडे जगवा**

## नमीताताईची केज विधानसभेत दबंग इन्ट्री



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज विधान सभा मतदार संघात नमिताताई मुंदडा (भाजपा)व प्रथ्वीराज साठे(शपग राष्ट्रवादी कॉंग्रेस पा) या दोघात चुरशशची लडत झाली .आखेर नमीताताई नी दबंग ईन्ट्री करत विजयाची पताका फडकावली. नमीताताईला एकुण १,१७,०८१ मते मिळाली तर प्रथ्वीराज साठे यांना १,१४,३९४ मते मिळाली .ईतर २४लहान मोठे उमेदवार यांना १६,५८५ मिळाली आहेत.त्यामध्ये नमीताताई अक्षय मुंदडा २६८७ मतांनी विजयी घोषीत करण्यात आले.आमदार पंकजा ताई मुंडे व प्रितमताई मुंडे यांच्या नेत्रत्वाखाली हीनिवडणुक जिंकलो आहोत अशी प्रतिक्रिया आमदार नमीता ताई मुंदडा यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हटले आहे.पाच वर्षात जो विकास मी केज तालुक्यात केला त्या पेक्षा जास्त विकास करण्याची करण्यास आम्ही कटिबध्द आहोत.जनसामान्यांच्या आडिअडचणीला तत्पर धावुन जाण्याची उर्जा जनतेने मतदान रुपी दिली ती आत्मसात करत आहोत.

## भाजपचे भीमराव केराम सलग दुसऱ्यांदा विजयी

लोकनेता न्यूज नेटवर्क। माहूर । राजकिरण देशमुख

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात चांगली रंगत आली होती. एकुण १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.किनवट विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात चांगली रंगत आली होती. मात्र भिमराव केराम यांना ८५८९२ तर प्रदीप नाईक यांना ८०५१६ मिळाली आहेत. मात्र अटीतटीच्या लढतीमध्ये भिमराव केराम यांनी विजय मिळवून ४ हजार ७४७ मतांची आघाडी घेतली. विजयानंतर मतदारसंघता जल्लोष करण्यात आला.किनवट विधानसभा मतदारसंघात एकूण १७ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. प्रारंभी चौरंगी लढत होण्याचे चिन्ह होते. परंतु, शेवटच्या टप्प्यात अटीतटीची दुरंगी लढत झाली. आपलाच उमेदवार विजयी होणार असा दावा महायुती व महाआघाडीच्या कार्यकर्त्यांनी केला.



एकुण १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असले तरी महायुतीचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार भिमराव केराम, व महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्यातच खरी लढत झाली.अपक्ष उमेदवार सचिन नाईक व वंचित बहुजन आघाडीचे डॉ. पुंडलिक आमले हे कोणाचे मत विभाजन करतील यावरचं महाविकास आघाडीचा की, महायुतीचा उमेदवार विजयी ठरणार होती.विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत बुधवारी (ता.२०) एक लाख ४२ हजार २७३ पुरुषांपैकी १०४१५४, एक लाख ३६ हजार ३८१ स्त्रीयांपैकी ९६३४२ व ११ इतरांपैकी तिघांनी अशा एकूण दोन लाख ७८ हजार ६६५ मतदारांपैकी दोन लाख ४९९ (७१.९५%) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

## दरबार ए शायरी

जोर ए तकनिक तेरी
रंग लाये साथिया !
फिरभी हूं मै अवाम, ये जंग लडही
लूंगी साथिया !!
दौर ए सियासत का ऐसा
खेल जिसने कर दिया !
खुद अपनेही डमरूसे
वो घिर जायेगा साथिया !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

बदल हा नियतीचा नियम आहे
तो स्वीकारता यायला हवा
जगत रहावा प्रत्येक क्षण मोदाने
तरच सापडेल रस्ता नवा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## महायुती सत्तेत आली आणि मराठा समाजासाठी चांगल्या गोष्टी घडल्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

एक तर मराठा समाजाला मिळालेले डएइउ १०% स्वतंत्र आरक्षण आता ५ वर्ष न्यायालयात रद्द होणार नाही, यामुळे मराठा विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शासकीय नोकरीमध्ये भरती होतील...

दुसरे म्हणजे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर मिळालेल्या कुणबी नोंदी आता रद्द होणार नाहीत...

महायुती मधील दोन पक्षाचे प्रमुख मराठा आहेत, याचा मराठा समाजाला फायदा होईल...

मविआ पेक्षा महायुती मध्ये मराठा आमदारांना प्रतिनिधित्व मिळाले ही मराठा समाजासाठी चांगली बाब आहे...

राहिला प्रश्न म्हणजे मराठा समाजाला ५०% च्या आत

ओबीसी मधून आरक्षण देण्याचा तर यावर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला नवता... परंतु मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे




जो मराठा समाज कुणबी नोंदीच्या आधारे ओबीसी मध्ये गेला त्यांना महायुती सरकार आल्याने सुरक्षितता मिळाली आहे... १००

आरे विचार करा जरांगे पाटील यांच्या आंदोलना आगोदर एकही मराठा ओबीसी मध्ये नवता परंतु जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर किती मराठा ओबीसी मध्ये गेला... यासाठी जी राजकीय ताकद पाहिजे होती ती फक्त मराठा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे होती.... ऊ

आरक्षणाच्या लढाईमध्ये मराठा समाजाकडे हारण्यासाठी काहीही नव्हते कारण मराठा समाजाला आरक्षण पहिल्या पासून नवते... या लढाईत मराठा समाज फक्त जिंकला मंग ते इडब्ल्यूएस आरक्षण असो किंवा एसइबीसी आरक्षण असो किंवा कुणबी नोंदीच्या आधारे ओबीसी मध्ये गेलेला मराठा कुणबी समाज असो...

महायुती चा विजय म्हणजे ओबीसींचा विजय असूच शकत नाही कारण लोकसभेला महाविकास आघाडीचा विजय हा मराठा समाजाचा विजय नवता...

फक्त ओबीसी आमदारांचा विजय म्हणजे ओबीसींचा
विजय...

मराठा आमदारांचा विजय म्हणजे मराठ्यांचा
विजय...

आता काढा आकडे आणि मोजा ताकद...

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904